वाचले :- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र जा. क्र. याप्राशा/अनु-पीआर/४१६९. दिनांक:-३१/०३/२००१.

=====-=====

पुणे जिल्हा परिषद, पुणे
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण विभाग [प्राथमिक]
जा. क्र. जिप/शिक्षण/प्राथ/२/१५/ २५७ /२००१
पुणे दिनांक:- ३१/०३/२००१.

विषय :- शासन मान्य विनाअनुदानित जिल्हा परिषद. क्षेत्रांतील खाजगी प्राथमिक शाळांना सन २०००-२००१ या वर्षी अनुदानावर आणणे बाबत.

आदेश
====

उपरोक्त संदर्भिय क्रमांक १ नुसार पुणे जिल्हयांतील ज्या खाजगी प्राथमिक शाळांना सन १९९५-९६ व १९९६-९७ या वर्षो शासनाने मान्यता दिलेल्या आहेत त्या विनाअनुदानित खाजेगी प्राथमिक शाळांना खाली नमूद केले प्रमाणे अनुक्रमे ४० % व २० % अनुदान त्यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून मंजूरी देणेत येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नाव व ठिकाण | शासन मान्यता वर्षे | अनुदान मंजूरवर्षे | मान्य पदे | मंजूर टप्पा |
|---|---|---|---|---|---|
| १] | आयडीयल एज्यू. ट्रस्ट सय्यदनगर अलजदीद उर्दु प्राथ. शाळा गुलामअलीनगर | १९९५-९६ | २०००-२००१ | ४ | ४० % |
| २] | श्री. चक्रधर परमानंद ट्रस्ट शिक्षण मंडळ दत्तनगर आंबेगाव ता. हवेली ची श्री. चक्रधर विद्यामंदिर दत्तनगर आंबेगाव बु" ता. हवेली | १९९५-९६ | २०००-२००१ | ४ | ४० % |
| ३] | स्वामी विवेकानंद शि. मं. पुणेची मंजूरीबाई प्राथ. विद्या. दिघी | १९९५-९६ | २०००-२००१ | ४ | ४० % |
| ४] | ज्ञानज्योती एज्यु. असोची प्राथमिक ज्ञानज्योती विद्या. विकासनगर किवळे | १९९६-९७ | २०००-२००१ | ४ | २० % |
| ५] | महाराष्ट्र आरोग्य मंडळ हडपसर प्राथमिक शाळा तरवडेवस्ती महंमदवाडी हडपसर ता. हवेली | १९९६-९७ | २०००-२००१ | ४ | २० % |

उपरोक्त शाळांना मंजूर केलेले अनुदान हे खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यांत आलेले आहे.

१] शाळा मान्यतेच्या व अनुदानाच्या विहित अटी व शर्तीची पूर्तता करीत असली पाहि
२] शाळेस आवश्यक ते सर्व अभिलेख यथानियम व अद्यायावत ठेवलेले असावेत आणि लेखांचे वार्षिक लेखा परिक्षण चार्टन्ड अकौंटंट कडून प्रमाणित केलेले असले पाहिजे.
३] संस्था चालकाकडून अनुदान मंजूर व्हावे म्हणून न्यायालयात दावे अगर याचिका दाखल केलेल्या नसाव्यात.

कृ. मा. पहा.

४] संस्थे विरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी अथवा गैरव्यवहाराच्या तक्रारी नसाव्यात

५] प्राथमिक शाळांना अधिनियम आणि शासनाच्या वेळोवळी निघणा-या आदेशाचे [उदा:- विद्यार्थ्यांच्या प्रवेशा बाबत] काटेकोरपणे पालन केलेले असावे.

६] अनुदानाच्या निश्चितीमुळे जास्त रक्कम जमा झाली असे आढळून आल्यास ती रक्कम भविष्यात प्रदान होणा-या वेतनेत्तर अनुदानातून समायोजीत करून अथवा इतर प्रकारे शासनास परत करण्याची हमी संस्थेने दिलेली असावी.

७] संबंधित प्राथमिक शिक्षकांसाठी विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हता असलेले व विहित वयोमर्यादेतील शिक्षक /शिक्षिका नियुक्त केलेले/केलेल्या असावेत व पदे निकषानूसार सक्षम अधिका-यांनी मान्य केलेली असावीत तसेच शिक्षकांची भरती करताना शासनाचे वेळोवेळी विहित केलेल्या आरक्षण विषयक नियमांचे पालन केलेले असावे.

यापुढे शाळा प्रती वर्षी अटीच्या पूर्ततेच्या अधिन राहून टप्पाटप्प्याने अनुदानावर येण्यास पात्र राहतील.

शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

प्रति,

१] सचिव,

______________________

______________________

२] मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

महाराष्ट्र आरोग्य मंडळाची प्राथ. शाळा
सरतडेवस्ती मंहमदवाडी हडपसर पुणे २८

प्रत:-[१] माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहिस्तव,

१] मा. शिक्षण, प्रमुख शिक्षण मंडळ,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

२] मा. प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे- १८.

४०१. ६०१.

जावक क्र. १९६...
दि. ८/९/२००४...

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा. क्र. /खाप्राशा/ २९५५ /०४-०५
पुणे, दिनांक — ८/९/०४

प्रति,
चिटणीस,
महाराष्ट्र आरोग्य मंडळ प्राथ. शाळा
तरवडे वस्ती, महंमदवाडी, हडपसर, पुणे २८.

विषय : अनुदानाबाबत.

कळविण्यात येते की तुमच्या संस्थेची प्राथमिक विदयामंदिर तरवडे वस्ती, महंमदवाडी, ता. हवेली जि. पुणे या शाळेस सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षामध्ये जिल्हापरिषद पुणे यांचेकडून २० % अनुदानास मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच २००१-०२ या वर्षामध्ये ४०% अनुदान मान्य करण्यात आले आहे. त्याच प्रमाणे तुमच्या शाळेस सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षातील ६० % अनुदान देय आहे.

तरी योग्य त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करून पस्ताव आमचे कार्यालयाकडे सादर करावा.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

६०१.

जावक क्रमांक २१७...
तारीख १५/१/२००५...

18

जाक्रप्रा./प्राथ./खाप्राशा/ट.अ./पीआर/२००४
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 13 JAN 2005

प्रति

मुख्याध्यापक,
महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे
प्राथमिक विद्यामंदिर,
तरवडेवस्ती, हडपसर, ता. हवेली, जि. पुणे.

**विषय** : अंशतः अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षासाठीच्या पुढील अनुदान टप्पा मंजूर करणेबाबत.

**संदर्भ** : मा. शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस-२००४ (१०८/०४) प्राशि-२, दि. ११ एप्रिल, २००४

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे** यांचेकडून आपल्या शाळेचा पुढील वाढीव टप्पा अनुदानासाठीचा प्रस्ताव प्राप्त झालेला असून संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या निकषानुसार सदर प्रस्तावाची छाननी केली असता, सदर निकषांची शाळा पुर्तता करीत असल्याने/ ~~नसल्याने~~ सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षासाठी वाढीव पुढील टप्पा ८० टक्के अनुदानास मंजूर करण्यात येत आहे.

शाळेमध्ये मंजूर असलेल्या पदावर ज्या शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आलेले आहेत त्या कार्यरत शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी तसेच मनपा/नपा शिक्षण मंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये शाळा असल्यास त्याबाबत शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी यांचेकडे प्रस्ताव दाखल करुन वैयक्तिक मान्यता घेण्यात याव्यात.

वैयक्तिक मान्यता पूर्ण झाल्यानंतरच त्यांना देय ठरणारी वेतनश्रेणी/शिक्षण सेवक मानधन विचारात घेऊन त्या पदांना आवश्यक असणाऱ्या वेतन अनुदानाची मागणी प्राथमिक शिक्षण संचालनालयास करण्यात येणार असून संचालनालयाकडून वेतन अनुदान प्राप्त झाल्यानंतरच ते वितरीत करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत : अधिक्षक,
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक विभाग),
जिल्हा परिषद, पुणे
यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
२/- आपणास कळविण्या येते की, संबंधीत शाळांमधील मंजूर पदावर कार्यरत असणाऱ्या शिक्षकांच्या वेयक्तिक मान्यता सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या आहेत किंवा नाही हे तपासूनच सदर शाळांचे वेतन अनुदान वितरीत करण्यात यावे.

२. शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे.

D:\dept\lawar\९० order.doc

१००१.

२६१...
११/३/०६...

54

जाक्रमा./प्राथ./खाप्राशा/ट.अ./पीआर/२००४/४३५२/४५८
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 10 MAR 2006

प्रति

मुख्याध्यापक,
महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे,
प्राथमिक विद्यामंदिर तरवडेवस्ती
हडपसर, पुणे.

विषय : अंशतः अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षासाठीच्या पुढील अनुदान टप्पा मंजूर करणेबाबत. . .

संदर्भ : मा. शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस-२००४ (१०८/०४) प्राशि-३, दि. १९ एप्रिल, २००४

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे** यांचेकडून आपल्या शाळेचा पुढील वाढीव टप्पा अनुदानासाठीचा प्रस्ताव प्राप्त झालेला असून संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या निकषानुसार सदर प्रस्तावाची छाननी केली असता, सदर निकषाची शाळा पुर्तता करीत असल्याने/नसल्याने सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षासाठी वाढीव पुर्वीचा टप्पा १०० टक्के अनुदानास मंजूर करण्यात येत आहे.

शाळेमध्ये मंजूर असलेल्या पदावर ज्या शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आलेले आहेत त्या कार्यरत शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी तसेच मनपा/नपा शिक्षण मंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये शाळा असल्यास त्याबाबत शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी यांचेकडे प्रस्ताव दाखल करुन वैयक्तिक मान्यता घेण्यात याव्यात.

सदरचे आदेश संबंधित शाळेस तात्काळ निर्गमित करण्यात यावेत.

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत : अधिक्षक,
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक विभाग),
जिल्हा परिषद, पुणे
यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
२/- आपणास कळविण्या येते की, संबंधीत शाळांमधील मंजूर पदावर कार्यरत असणाऱ्या शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या आहेत किंवा नाही हे तपासूनच सदर शाळांचे वेतन अनुदान वितरीत करण्यात यावे.

२. शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे